## प्रकरण पाचवे

## उपसंहार

# प्रकरण पाचवे

--------

## - उपसंहार -

------

बा. भ. बोरकर यांची ' भावीण ' आणि जयवंत दळवी यांची ' महानंदा ' या दोन कादंब-या गोमंतकाच्या पार्श्वभूमीवरील आहेत. दोन्हीही कादंब-यांत भाविणींचे जीवन चित्रित झाले आहे. उपेक्षेच्या दु:खात अगतिकपणे जीवन जगणा-या भावीण स्त्रियांच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा या दोन्ही लेखकांनी प्रयत्न केला आहे. या दोन्ही कादंब-यांत सामाजिकता कोणत्या प्रकारे अवतरते याचा अभ्यास करणे आणि त्यांच्या वाङ्मयीन गुणवत्तेचे मूल्यमापन करणे हा उद्देश ठेवून या लघुप्रबंधिकेचा अभ्यास विषय निश्चित केला होता.

' भाविणी ' या सावंतवाडी, सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्हा आणि गोमंतकात आढळणा-या देवदासी आहेत. भाविणी कमी शिकलेल्या असत व नृत्य-गायनात प्रवीण नसत. त्या मंदिराची झाडलोट करीत. दिवे लावीत व ईश्वराच्या पूजेत भाग घेत. त्या पुष्कळदा वेश्या व्यवसाय करीत. रत्नागिरी जिल्हयातील सावंतवाडीमध्ये भाविणी आढळून येत.[1] खरे पाहिले तर समाजातील उपेक्षेचे जीवन धर्मानेच त्यांच्या माथी मारले आहे. त्या वाईट चालीच्या, भ्रष्ट आहेत असे समजून भ्रष्टतेच्या खाते-यात त्यांना लोटणारा समाजच त्यांच्याकडे अत्यंत वाईट नजरेने पाहतो. म्हणूनच सुहृदांच्या मनात त्यांच्याविषयी करूणा निर्माण होते.

बदलत्या परिस्थितीत मनावर असलेला धार्मिक तणाव आणि सामाजिक दबाव यांच्यामुळे निर्माण होणा-या मानसिक कोंडमा-यात सापडून त्या घुसमटतात. परंपरेने लादलेल्या जीवनातून त्या सुटू पाहतात. ते जीवन झुगारून देण्यासाठी त्या सिध्द होतात. पण धर्मरूढीने नशिबी आलेला अन्याय वेशीवर टांगण्याचे बळ त्यांच्याजवळ नसते. म्हणूनच व्यक्तिगत पातळीवर त्यांनी चालवलेल्या सामाजिक संघर्षात त्या अपयशी ठरतात.

आपण लग्न करावे. संसार थाटावा. आपणाला मुले-बाळे व्हावीत आणि सुखाने गृहस्थी जीवन जगावे असे त्यांना मनापासून वाटत असते. पण त्यांची ही इच्छा समाजातील स्वार्थी भोगलालसे पुढे टिकाव धरूच शकत नाही. ती उधळून लावली जाते. पण या जमातीतील काही स्त्रिया परंपरा नाकारण्यास सिध्द होतात. समाजातील कोणत्याही दिव्याला सामोरे जाण्याची तयारी ठेवतात. अस्वस्थ

होतात. पण ती परंपराच त्यांचा बळी घेते. हा जो बळी जातो तो केवळ समाजावर परंपरेच्या बसलेल्या घट्ट पगडयामुळेच होय. धर्मभोळेपणा, जुन्या रूढी, अंधश्रध्दा, लोकविश्वास याच्यातूनच निर्माण होणा-या नीति-अनीतीच्या साचेबंद कल्पनांच्या सामाजिक चौकटीत सापडलेल्या व्यक्तीच्या मनावर अपरिहार्यपणे धार्मिक तणाव निर्माण होतो. ती व्यक्ती अस्वस्थ होते. तो तणाव किंवा ती अस्वस्थता हा एक तीव्र जाणिवेचा सामाजिक प्रश्न आहे. हा प्रश्न सामाजिक समस्येतून निर्माण झालेला आहे. या समस्येत सापडलेली व्यक्ती पिढयापिढयांचे दु:ख भोगत जगते. अंत:करणातून जळत होरपळत जाते.

अशाच सामाजिक समस्येचे चित्रण करणा-या ' भावीण ' आणि ' महानंदा ' या दोन लक्षणीय कादंब-या आहेत. या दोन्ही कादंब-या भावीण समाजाचे वास्तव दर्शन घडवणा-या ठरल्या आहेत. जणू काही भावीण जीवनातील उपेक्षित स्त्रियांच्या अंत:करणातील दु:ख या कादंब-यांतील ' शेवंती ' व ' महानंदा ' या नायिकांच्या रूपाने तीव्रतर होऊन बाहेर आले आहे. त्या दोघींचेही ते दु:ख त्यांच्या व्यक्तिगत पातळीवर राहत नाही. तर ते त्यांच्या ' भावीण ' जातीचेच दु:ख ठरते. भावीण जीवनाच्या ' प्रतिनिधी ' म्हणूनच त्या आपल्या समोर येतात.

त्या दोघींच्या माध्यमातून भावीण जीवन चित्रणच आपण प्रत्यक्ष अनुभवत जातो. आणि त्यांच्या जीवनातील त्या समस्येमुळे त्यांच्यावर गुदरलेले प्रसंग, त्याच्यातून निर्माण झालेले दु:ख पाहून आपल्यासमोर काही प्रश्न निर्माण होतात. मनात एक प्रकारची अस्वस्थ कालवाकालव होते. ती कालवाकालवच त्या कादंब-यांची यशस्विता ठरते.

भावना आणि वेदना एकाचवेळी साकारत पुढे सरकणा-या या दोन्हीही कादंब-या आहेत. दोन्हीही कादंब-यांत उपकथानके आणि जीवनांतर्गत विखुरलेपण आढळते. पण त्यामुळे भावीण जीवनाशी संबंधित सामाजिक जीवनाचा वेध घेण्यात या दोन्हीही कादंब-या अपयशी ठरत नाहीत तर त्या दु:खाची तीव्रता वाढवण्यासाठी ते आवश्यकच ठरले आहे.

या दोन्हीही कादंब-या ' प्रादेशिक ' म्हणूनच ओळखल्या जातात. उपेक्षित स्त्रियांच्या जीवन चित्रणाबरोबर भावीण धर्म आणि त्यांच्या समाजस्थितीची आपणाला माहिती होते. त्या बरोबरच सावंतवाडी, गोव्याच्या दुर्लक्षित प्रदेशाचे, निसर्ग संपन्नतेचे, लोकजीवनाचेही आपणाला दर्शन होते. गोमंतकात रूढ असलेल्या कोकणी भाषेची आपणाला माहिती होते. दोन्हीही कादंब-यांतील वास्तव जीवन चित्रण अतिशय कलात्मक पातळीवर उतरले आहे. त्यातील समाज जीवनाचे चित्रण अतिशय प्रत्ययकारी वाटते.

जातीपेक्षा माणूस महत्वाचा. जिव्हाळयाची नाती निर्माण झाली की जातपात आपोआपच बाजूला फेकली जाते अशाप्रकारची ध्येयनिष्ठ जाणीव दोन्हीही कादंबरीतील नायकांमध्ये आहे. तर ' शेवंती ' आणि ' महानंदा ' या दोन्हीही भावीणकन्या असलेल्या नायिकांमध्ये परिवर्तनाची चाहूल आढळते. भावीण धर्माच्याच त्यागाला त्या तयार झाल्या आहेत. वैवाहिक जीवनासाठी आसुसल्या आहेत. गृहस्थी बनण्यासाठी त्या तळमळत आहेत. म्हणूनच आपल्या परंपरागत व्यवसायातून बाहेर पडून त्या स्वतंत्र होऊ इच्छितात. पण दोघींच्याही जन्मदात्री परंपरेला घट्ट चिकटून आहेत. भाविणींचे लग्न हे त्यांच्यादृष्टीने ' पाप ' आहे. तेच त्या आपल्या मुलींच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करत आहेत. दुर्दैवाने धर्मभोळेपणा आणि रूढीच्या शृंखलेत सापडलेल्या दोघींच्याही प्रेमाची दारूण वाताहत होते. प्रेमपूर्ती होत नाही. दोघीही परंपरेने निर्माण झालेल्या परिस्थितीला शरण गेल्या आहेत. महत्वाचे म्हणजे परिवर्तनाची चाहूल दोघींच्याही विचारात दिसते पण प्रस्थापित समाजव्यवस्थे विरूध्द/ परंपेविरूध्द उघड बंड किंवा संघर्ष करण्याची त्यांची मानसिक तयारी दिसत नाही. सहनशीलता हाच त्यांचा स्वभाव विशेष होतो.

दोन्हीही लेखकांचा समाज जीवनाचा अनुभव, जीवन जाणिवेतून केलेले निरीक्षण हळवेपणा आणि चिंतन यांचा एकत्रित झालेला आविष्कार या कादंब-यांतून आढळतो. दोन्हीही कादंब-या भावीण जीवनाशी संबंधित आहेत. तरी देखील अतिरेकी भडक शृंगार, अश्लील आणि शिवीगाळ करणारी भाषा कादंबरीत उतरलेली नाही. ते अतिशय महत्वाचे आहे. प्रसन्न व काव्यात्म हळुवार भाषेच्या वापराबरोबर आवश्यक तेथे प्रादेशिक बोलीचा चपखल वापर करून कादंब-यांत उठावदार वातावरण निर्मिती लेखकांनी घडवून आणली आहे.

एकंदरीत समाजातील एका महत्वाच्या समस्येचा वेध घेणा-या या कादंब-या मराठी साहित्यात निश्चितच महत्वाच्या आहेत. सामाजिक विषयावरील असूनही त्यांच्यात कोठेही प्रचारकी थाट नाही. तर गोमंतकातील निसर्गसंपन्न वातावरण, त्या प्रदेशात आढळणा-या भाविणी (देवदासी) , तेथील सामाजिक, धार्मिक परंपरा, त्या वातावरणात प्रेमी जीवांचे फुललेले प्रेम, सामाजिक रूढि-बंधनामुळे त्या प्रेमाची झालेली दारूण वाताहत शिवाय निसर्गनियमाबरोबर नियतीच्या फे-यात सापडलेली वेगवेगळया वृत्ती-प्रवृत्तींची, भिन्न-भिन्न स्वभावाची माणसे, परिस्थितीने त्यांच्या जीवनात निर्माण झालेली हतबलता, त्यामुळे त्यांना त्यांच्याच जीवनाविषयीची वाटणारी निरर्थकता या संबंधातील अनेक प्रसंग या कादंब-यांतून हाताळले आहेत. त्या त्या ठिकाणचे वास्तव जीवनदर्शनच त्यातून उतरले आहे. म्हणूनच या कादंब-या वाचत

असताना वाचकांत एक प्रकारची उत्कंठा कायम राहते. कादंब-या वाचून हातावेगळया झाल्यानंतर धर्मप्रवृत्तीतून सामाजिक परंपरेचा बळी ठरलेल्या व्यक्तीविषयीची हळहळ अंतःकरणाला झोंबत खोलवर उतरत जाते. आणि मनात एक प्रकारची करूणा वाटत असतानाच हे असे का ? असा सामाजिक पातळीवर अनुत्तरित ठरणारा प्रश्न निर्माण होतो.

लेखकाचे जीवनानुभव साहित्यातून उतरले की निर्माण होणा-या कलाकृतीला ख-या अर्थाने सामाजिक परिमाण प्राप्त होते. लेखक ज्या काळात जगत असतो त्या काळातील सांस्कृतिक परंपरेतून निर्माण होणा-या सामाजिक मूल्यांचा प्रभाव त्याच्या मनावर पडत असतो. साहजिकच हा प्रभाव त्याने निर्माण केलेल्या साहित्यकृतीतून प्रकट होत जातो. धर्म, रूढी, परंपरा, नीति-अनीती यांसारखे प्रश्न समाजाशी चिकटून असतात. या प्रश्नातून निर्माण होणा-या साहित्यकृतीतून सामाजिकताच अवतरत असते. या पार्श्वभूमीवर पाहिले तर ' भावीण ' आणि ' महानंदा ' या दोन्ही कादंब-या लक्षणीय ठरतात त्या त्यांच्या आंतरिक भावदर्शनामुळे । धर्मश्रध्देतून निर्माण झालेले पारंपरिक रीतिरिवाज आणि त्यामुळे निर्माण होणारा मानसिक तणाव या दोन्हीही कादंब-यांतून चित्रित केला आहे. भावीण जीवनाच्या अंतरंगात प्रवेश करून त्यांच्या अंतःकरणात खदखदणारे दुःख दाखवून देण्याचे काम लेखकद्वयांनी प्रामाणिकपणे केले आहे.

साहित्य आणि समाज यांच्यातील अन्योन्यता लक्षात घेतली तर या दोन्हीही कादंब-यांतून हाताळलेली सामाजिक समस्या आणि त्यातून निर्माण होणारी भाविणींच्या जीवनाची होरपळ वाचकाला चटका लावून जाणारी आहे. बा.भ. बोरकर व जयवंत दळवी या दोन्हीही लेखकांचा जीवनानुभव या कादंब-यांतून अतिशय प्रत्ययकारीपणे जाणवतो. प्रादेशिक पातळीवरचे हे जीवन त्यांनी अतिशय वास्तवदर्शी उतरवले आहे. म्हणूनच त्यातील सामाजिक संदर्भ महत्वाचा वाटतो. तो दाखवण्यासाठीच लेखकद्वयांनी कथानक, उपकथानकांची कादंबरीत केलेली योजकता महत्वाची आहे. वाचताना कादंब-या जरी विखुरल्या सारख्या वाटत असल्या तरी त्या त्यातील आशयाशी घट्ट चिकटून आहेत. म्हणूनच सामाजिक समस्येतून निर्माण झालेल्या भावीण जीवनाचे अंतःपदर उलगडून दाखवण्यास त्या समर्थ ठरल्या आहेत.

या कादंब-यांत आलेली वाचकांसमोर प्रत्यक्ष गोमंतकच साकार करणारी शब्दचित्रे, हळुवार, काव्यात्म भाषेला आलेली लेखकाच्या चिंतनाची डूब प्रत्येक शब्दाशब्दातून प्रकट होते. कोकणचे रीतिरिवाज, रूढी, परंपरा, धर्मश्रध्दा अगदी अकृत्रिमपणे येथे सादर झाल्या आहेत. वातावरण निर्मितीसाठी

वापरलेली बोलीभाषा अतिशय चपखल बसली आहे. म्हणूनच उपेक्षेच्या दु:खात अगतिकपणे जीवन जगणा-या भाविणींच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा लेखकद्वयांनी समरसतेने केलेला प्रयत्न यशस्वी ठरला आहे.

देवदासींचे दर्शन घडविणा-या या दोन्हीही कादंब-या वाङ्मयीनदृष्टया श्रेष्ठ आहेत. दोन्हीही कादंब-यांना सामाजिक मूल्य प्राप्त होते पण त्या हळूवार व काव्यात्म भाषाशैलीत असल्यामुळे रंजक वाटतात. शिवाय या कादंब-यांतून फक्त देवदासींच्या समस्येचे विवेचन होत गेले असते तर ते रूक्ष समाजशास्त्रीय विवेचन ठरले असते. ती सामाजिक समस्या लालित्यपूर्ण भाषाशैलीत मांडून दोन्हीही साहित्यिक लेखन कौशल्याच्या कसोटीवर उतरले आहेत. ज्या सामाजिक प्रश्नावर या कादंब-यांची निर्मिती झाली आहे त्या भाविणींचा आणि या कादंब-यांचा समाजशास्त्रीय पातळीवर दुस-या अंगानेही विचार करता येईल.

समाजात आढळणा-या अनेकविध आचारविचारांच्या घटकांबरोबरच ' देवदासी ' प्रथेशी निगडित असणारा एक घटकही आढळतो. विशिष्ट परिस्थितीत देवाची सेवा करून मिळणा-या मदतीवर आपली उपजीविका करण्याची पध्दत या देवदासी समाजातील स्त्रियांच्यात आढळते. या समाजातील स्त्रियांना प्रत्यक्षात वेगळयाच प्रश्नाला सामोरे जावे लागले आहे. देवसेवा करता करता अशा देवदासी स्त्रीला देवाची आज्ञा म्हणून एखाद्या पुरूषाने मागणी केली तर भोग द्यावा लागतो. कोणतेही बंधन न ठेवता मिळतील ते पैसे स्वीकारून शारीरिक संबंध करावा लागतो. देवा-धर्माच्या नावाखाली चाललेली ही एकप्रकारची अनीती. ती त्यांना नीती म्हणूनच स्वीकारावी लागते. पण ती पाप-पुण्याच्या कल्पनेशी निगडित आहे. ही पध्दत संपूर्ण भारतभर अगदी प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. मात्र वेगवेगळया प्रांतात अशा प्रकारच्या देवदासींना वेगवेगळया प्रकारची नावे आहेत. बसवी, मंगेशी, देवळी, मुरळी, जोगती, भावीण ही त्यातलीच नावे आहेत.

' भावीण ' हा देवदासींचा प्रकार. तो गोमंतक व कोकणात अस्तित्वात आहे. अशा भावीण स्त्रियांना परिस्थितीने वारांगनेचे जीवन जगावे लागते ही वस्तुस्थिती आहे. देवदासी प्रथेतून अस्तित्वात आलेला भावीण हा समाजातील घटक. परंतु परंपरागत चाली, रीतिरिवाजामुळे या समाजातील स्त्रियांना आपल्या पारंपारिक व्यवसायाबरोबरच पुरूषांची एक उपभोग्य वस्तू म्हणूनच आपले जीवन जगावे लागते. एका विशिष्ट चौकटीच्या बाहेर त्यांना पडताच येत नाही. कारण या परंपरेबरोबरच त्या अंधश्रध्द आणि धर्मभोळया बनलेल्या आहेत.

भाविणींचा प्रश्न हा एक सामाजिक प्रश्न आहे हे खरे आहे. विशिष्ट परिस्थितीत समाजात आढळणा-या स्वार्थी व्यवस्थेने या समूहातील स्त्रियांना केवळ वापरले आणि तीच पध्दत परंपरेने पुढे चालत राहिली. तसे पाहिले तर आज ती एक सामाजिक समस्या आहे. ही समस्या सोडवण्यास कठीण वाटते. कारण हा प्रश्न इतका जटिल आहे, की एका प्रश्नातून अनेक उपप्रश्न निर्माण होणारा आहे. ही समस्या किंवा प्रश्न एका भावीण स्त्री पुरता मर्यादित राहत नाही तर समाजात अन्यत्र पसरलेला दिसतो. स्वतःच्या जीवनात भावीण दुःखी आणि अगतिक असतेच पण परंपरेच्या दलदलीत रूतून बसल्यामुळे त्या चाकोरीतून ती बाहेर पडू शकत नाही. अशा परिस्थितीत तिच्या पोटी जन्माला आलेल्या अपत्यांना ' बाप ' नसतो त्यामुळे तिच्या मुलांना समाजात उपेक्षित जीवनच जगावे लागते. त्यांनाही दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्देच्या अंधारात चाचपडावे लागते. एखादा पुरूष पूर्णपणे एखाद्या भाविणीच्या आहारी गेला तर त्या पुरूषाची पत्नी, त्यांची मुले - बाळे यांच्या दरम्यान निर्माण होणारा कौटुंबिक तणाव हा तर वेगळाच प्रश्न राहतो.

या स्त्रियांना परिस्थितीने वारांगनेचे जीवन जगावे लागते. त्या उपेक्षित आहेत. परंतु त्यांच्यामुळे निर्माण होणा-या सामाजिक प्रश्नाला इतर घटकांच्या दृष्टीने उत्तरही त्याच आहेत. कारण त्या आहेत म्हणून समाज निरोगी आहे. समाजातील अनीतीचे, अनैतिकतेचे प्रमाण काहीसे कमी होते ते त्यांच्यामुळेच. म्हणून सामाजिक समस्येतून जगत असताना त्या एक फार मोठे समाजिक कार्य करतात. म्हणून देवदासी व्यवस्थेत अडकलेल्या भावीण स्त्रियांच्याकडे पाहताना एक उपभोग्य वस्तू म्हणून न पाहता समाजातील एक महत्वाचा मानवी घटक म्हणून पाहणे गरजेचे आहे. त्या आणि त्यांच्या मुलांना समाजात न्याय्य स्थान मिळणे गरजेचे आहे. त्यांना योग्य जीवनस्तर लाभावा ही आज काळाचीच गरज ठरते आहे. त्यामुळेच साहित्य आणि परिवर्तनाची आवश्यकता आहे. परिवर्तनासाठी साहित्याची साधन म्हणूनच मदत होते, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

लेखक हा विचाराने प्रगल्भ असतो. तो तरल निर्मिती करू शकतो. साहित्यिक हा आपल्या साहित्यातून वास्तव व वास्तविक समस्याच मांडतो असे नाही तर वेळोवेळी आपल्या चिंतनातून सामाजिक पातळीवरील काही प्रश्नांची तो उत्तरे शोधतो आणि आपल्या साहित्यकृतीतून ती मांडतो. त्याचा प्रभाव समाजावर, समूहमनावर पडतो आणि समाजाला निश्चित अशा परिवर्तनाची स्वशक्तीप्राप्त होते. दिशा मिळते. प्रत्यक्षात कोणत्याही समूह मनाची ताकद मोठी असते पण त्याला प्रगल्भता कमी असते. त्यामुळेच वैचारिकतेपेक्षा समूहमन जास्त करून परंपरागत आणि ढोबळपद्धतीनेच वागताना

दिसते. त्यामुळे एखाद्या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करून उत्तर शोधणे समाजमनामध्ये घडत नसले तरी अशा परिस्थितीत सामाजिक पातळीवरील एखाद्या समस्येचे किंवा प्रश्नाचे उत्तर साहित्यातून शोधले तर त्याची प्रतिक्रिया मात्र समूहमनावर उमटू शकते आणि निश्चित अशा उद्देशाच्या साध्याची दिशा सापडते. परिवर्तन घडू शकते.

साहित्य हे सामाजिक परिवर्तनासाठी अत्यंत आवश्यक आहे. अनेक सामाजिक प्रश्नांची उत्तरे साहित्यकृतीतून मांडताना साहित्यिक समाजाच्या मनावर एक प्रकारचा मानसंस्कार करीत असतो. वाचकाला दृष्टी देत असतो. त्याच्यातून वाचक ब-या वाईटाचा विचार करून सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत चिंतनशील बनतो. म्हणजे त्याला विचारप्रवण बनविण्यासाठी तशा प्रकारच्या सकस आणि श्रेष्ठ साहित्याची निर्मिती आवश्यक असते. साहित्य हे समाजालाच एखाद्या प्रचलित वाईट प्रश्नाविरूध्द संघर्षसिध्द व्हायला सांगते. म्हणूनच की काय देवदासीच्या जीवनाशी संबंधित अशा प्रकारच्या कादंब-या ना. सी. फडके, वि.स. खांडेकर, श्री.व्यं. केतकर, अण्णाभाऊ साठे यांसारख्या अनेक मान्यवर कादंबरीकारांनी लिहिल्या आहेत. त्या विशिष्ट परिस्थितीत वाचकांनी वाचल्याही आहेत. पण समाजाला एखादा प्रश्न दाखवून देऊन त्याच्यावर निश्चित असा परिणाम घडवून आणण्यासाठी काही कालावधी जाणे गरजेचे असते. एखादा प्रश्न सतत निदर्शनास आणून देणे आवश्यक ठरते. म्हणूनच मराठी साहित्यात या विषयावर सातत्याने लेखन झालेले आहे. भावीण, महानंदा, गोमंतका जागा हो, देवकी, जोगीण, झुलवा, चौंडक यासारख्या कादंब-या याच प्रेरणेतून निर्माण झाल्या आहेत असे स्पष्ट दिसते.

आता या पार्श्वभूमीवर येथील कादंब-यांचा पुनर्विचार करावयाचा झाल्यास असे दिसून येईल, की ' भावीण ' ही कादंबरी वरील प्रेरणासूत्रातीलच कादंबरी आहे. ती स्वतः लेखकालाही एक यशस्वी कादंबरी वाटली आहे. गोमंतकात आढळणा-या भावीण स्त्रियांचे वास्तव जीवन चित्रण त्यांनी तिच्यातून घडविले आहे. या कादंबरीत आलेली नायिका शेवंती ही ध्येयवादी आणि उदात्त अंतःकरणाची लेखकाने घेतली आहे. ही शेवंती इतकी उदात्त आहे, की ती उदात्तताच वाचकांना एक अतिशयोक्ती वाटते. कारण स्वतःच्या मनाविरूध्द आपल्या भावीण आईच्या इच्छेखातर ती एका युरोपियन जज्जाला भोग देते. मानभंग झाल्यानंतरही त्या जज्जाच्या विनंतीवरून ती त्याच्याकडून कायम पैसे स्वीकारते. पुढे विवाहित केशववर ती अनुरक्त होते आणि जज्जाचे पैसे नाकारते. केशवच्या विश्वासास उतरण्यासाठी त्याच्या विनंतीवरून ती तनामनाने हृषीच्या सेवेत ' रत ' होते. पुढे हृषीचेच तिच्यावर प्रेम बसते आणि भावीण जीवनाशी एकरूप झालेल्या आईचा विरोध पत्करून ती त्याच्याशी लग्नाला तयार होते.

पण हृषी. हा आपल्या बहिणीचा नियोजित वर आहे हे समजल्यानंतर ती आत्मसमर्पण करते. हा सर्वभाग कथानकाच्या रंजकतेसाठीच लेखकाने घातला आहे. मात्र तिच्या मुळाशी ' भावीण ' आणि तिचे 'प्रश्न' आहेतच. कारण कोणतीही आदर्श स्त्री कोणाच्याही विनंतीनुसार आपले शरीर दुस-याच्या स्वाधीन करणार नाही. ती भावीण होती म्हणूनच वेडातून बाहेर पडण्यासाठी स्त्री सुखाची गरज असणा-या हृषीला तिच्याजवळ ठेवले होते. ' रंजना ' ही त्याची नियोजित वधू होती. शिवाय ती त्याच्या मामची मुलगी होती तरीही हृषीला त्या उमनस्क आवस्थेतून बाहेर काढण्यासाठी ती पुढे येत नाही. हृषीला स्त्री सहवासाची आवश्यकता आहे हे माहिती असूनही त्याचे मामा असे लग्न हे धर्मसंमत नाही म्हणून वेळ मारून नेतात. हे येथे विचारात घेण्यासारखे आहे. शिवाय हृषीच्या मामापासूनच फुलवंती भाविणीच्या पोटी शेवंती जन्मली होती. हे माहिती असूनही ते तिला आपली मानत नाहीत किंवा तिला आपले नावही देत नाहीत. हे ही येथे विचारात घेण्यासारखे आहे. या प्रश्नातूनच भाविणीच्या दुःखाची कल्पना आपणाला येते.

कादंबरीतील पात्रांचे चित्रण कुठेही अपुरे वाटत नाही. फक्त शेवंतीचे जगणे, वागणे इतर भाविणींपेक्षा वेगळे आणि एकांगी वाटते. पण ती या कादंबरीतील परिवर्तनाला तयार झालेली नायिका आहे. म्हणूनच संपूर्ण भावीण समाजाचे ' प्रतिनिधित्व ' करणारे तिचे चित्रण आशयसूत्राला व्यापून टाकणारे ठरले आहे. रंजकतेच्या व उदात्तीकरणाच्या पातळीवरही या कादंबरीचा सामाजिक आशय महत्वाचा ठरतो. म्हणूनच या कादंबरीला आपोआपच गंभीर स्वरूपाचे सामाजिक मूल्य प्राप्त होते व वाचक चिंतनशील बनतो हे येथे महत्वाचे आहे.

बोरकरांप्रमाणेच कोकणातील भाविणींचे जीवन दर्शन अगदी वास्तव पातळीवर दळवींनी आपल्या ' महानंदा ' या कादंबरीतुन घडवून आणले आहे. आकाराने लहान असणा-या या कादंबरीत नाटयपूर्ण संवाद लेखनाची रचना करून भावीण जीवनातील नाटयच त्यांनी वाचकांसमोर सादर केले आहे. या कादंबरीलाही ' भावीण ' कादंबरी प्रमाणेच गंभीर स्वरूपाचे सामाजिक मूल्य प्राप्त झाले आहे. या कादंबरीत भावीण धर्मामुळे घडलेली महानंदा आणि बाबुल यांच्या विफल प्रेमाची शोकांतिका आपण वाचतो.

भावीणकन्या महानंदा आणि कर्तृत्ववान तरूण बाबुल यांच्या प्रेमाची वाताहत होऊन भावनांची होरपळ होण्यास परंपरेत अडकलेला भावीण धर्मच कारणीभूत आहे. कारण सुट्टीत मामाच्या गावी

आलेला बाबुल नकळत महानंदेच्या प्रेमात पडतो. तिच्याशी लग्नाची बोलणी करतो पण अंधश्रध्दा आणि धर्मभोळेपणात अडकलेली महानंदेची आई ते लग्न होऊ देत नाही. भाविणीने लग्न केले तर देव डोळे फोडील अशी तिची समजूत आहे. ती पापपुण्याच्या कल्पनेत पूर्णपणे अडकलेली आहे. यातूनच महानंदा आणि बाबुलच्या आयुष्याची फरपट होते आणि त्यांना आयुष्यभर मनाने जळत जगावे लागते. पुढे बाबुलपासून झालेल्या दमयंतीला भावीण धर्माचा स्पर्श होऊ नये म्हणून महानंदा काळजी घेते पण ही काळजी घेताना दोघींच्या उपजीविकेसाठी तिला वारांगनेचेच जीवन जगावे लागते, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

या कादंबरीतही कादंबरीची रंजकता वाढवण्यासाठी घेतलेले काही प्रसंग हळुवार व काव्यात्म वाटतात. पण ते या कादंबरीतील मूळ भावीण जीवनाशी संबंधित असणा-या आशयाला धक्का पोचवत नाहीत. या कादंबरीतील महानंदेची आई कल्याणी ही भाविणीतल्या फुलवंतीप्रमाणेच जुन्या विचाराला चिकटून आहे आणि महानंदा परिवर्तनाच्या विचारानेच संघर्षशील बनली आहे. शेवटी ती परिस्थितीने नियतीला शरण गेली आहे. या कादंबरीतील नायक बाबुल उच्चशिक्षित, बुध्दिमान व कर्तृत्ववान तरूण आहे. पण तो ही प्रस्थापित समाज व्यवस्थेविरूध्द संघर्ष करताना हतबल ठरला आहे. ही कादंबरी वाचत असताना कादंबरीत घडलेले प्रसंग हे केवळ परंपरागत भावीण जीवनामुळेच घडलेले आहेत हे जाणवते. या जीवनातून बाहेर पडून ' गृहस्थी ' जीवन जगण्याची इच्छा करण्या-या स्त्रीला फार मोठ्या मानसिक संघर्षाची तयारी ठेवावी लागते हे येथे स्पष्ट दिसते. या कादंबरीतील नायिका महानंदा या पातळीवर साहसी व संघर्षसिध्द दिसते. तिलाही या जीवनातून बाहेर पडण्याची तीव्र इच्छा दिसते. म्हणूनच ती विफल प्रेमाच्या आठवणीवर आयुष्यभर जळत जगते पण अखेरपर्यंत आपल्या विचाराशी ठाम राहते. कोणत्याही परिस्थितीत आपल्या मुलीवर भावीण धर्माचे संस्कार होऊ नयेत म्हणून ती प्रयत्न करते. तिचे हे प्रयत्न म्हणजेच या समाजातील अनेक तरूणींची परिवर्तनाची चाहूल आहे. या परिवर्तनाचे ' प्रतिनिधित्व ' या नायिकेकडे आले आहे.

ही कादंबरी आकाराने लहान असली तरी चार भावीण पिढ्यांचे दर्शन घडवत परिवर्तनही ती दाखवते. भावीण जीवनाचे दु:ख ती उत्कट पातळीवर दाखविते म्हणून ही कादंबरी भावीण जीवनाचा व्यापक अनुभव देणारी ठरली आहे. कादंबरीचे चित्रण भावीण समस्येच्या आशयाशी एकरूप झालेले आहे. त्यामुळे ही कादंबरी अपुरी, एकांगी वाटत नाही. उलट वर उल्लेख केल्याप्रमाणे समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून तिच्यातून वास्तव जीवन दर्शनाबरोबरच परिवर्तनाचा विचार व दिशा यांचे सूचन घडते आहे.

सध्या सुरू असलेल्या सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेत या पुस्तकांचे मूल्य निश्चितच महत्वाचे वाटते. कारण देवदासीसारख्या अनिष्ट प्रथेत परंपरेने फसलेल्या या समाजातील लोकानां, स्त्रियांना माणूस म्हणून स्वातंत्र्याने जगण्याचा हक्क प्राप्त झाला पाहिजे. त्यासाठी प्रस्थापित समाजव्यवस्था बदलण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. वेगवेगळया पातळीवर सामाजिक परिवर्तनाचे कार्य करणा-या अनेक संघटना ही प्रथा नष्ट झाली पाहिजे म्हणून चळवळी करतात. चळवळीने कदाचित असे प्रश्न सुटतीलही. पण देवदासींचा हा प्रश्न सहजासहजी सुटण्यासारखा नाही. कारण या प्रश्नातच अनेक उपप्रश्न आहेत हे होय. सामाजिक पातळीवरील अधिक गुंतागुंतीचे असे प्रश्न सुटण्यास दीर्घकालाची व अधिक जागृतीची आवश्यकता असते. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी परिवर्तनाशी निगडित असणा-या अनेक संघटनांना अधिक बळ देण्यासाठी साहित्यातून त्या समस्या मांडल्या पाहिजेत. समस्येच्या सोडवणुकीसाठी उत्तर शोधणारा वाचक व समूहमन अस्वस्थ झाले पाहिजे. त्या चळवळीला अधिक जोर आला पाहिजे. या दृष्टिकोणातून देवदासी समस्येतील भावीण जीवनाचा वेध घेणा-या ' भावीण ' आणि ' महानंदा ' या दोन कादंब-या अतिशय लक्षणीय ठरल्या आहेत.

भावीण जीवन हे फक्त कोकण व गोमंतकातच आढळणारे आहे. मुळातच कोकणात दारिद्रय. त्या दारिद्रयात अगतिक आणि असहाय होऊन परंपरेने जीवन जगणा-या भाविणींचे जीवनच विचित्र असते. सौंदर्याची उपजत देणगी लाभलेल्या या स्त्रियांना पुरूषांच्या भोगलालसेपोटी आणि स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी शरीराचाच बाजार मांडावा लागतो. हे अतिशय वाईट आहे. या परिस्थितीचाच नेमकेपणाने विचार उपरोक्त दोन कादंब-यांतून आला आहे. म्हणूनच आजच्या परिवर्तनाच्या चळवळीच्या काळात भाविणींच्या जीवनाशी संबंधित प्रश्न हाताळणा-या या कादंब-या महत्वाच्या आहेत.

केवळ स्वप्नरंजन आणि कल्पनारम्य कांदब-या लिहून वाचकांची करमणूक करण्याचे आजचे दिवस नाहीत. समाजात नव्या बदलाचे वारे वाहताना आज आपणाला दिसते. या वातावरणात वास्तव जीवन दर्शन घडविणारे साहित्य वाचकाच्या हातात पडले तर त्या साहित्यातून अभिव्यक्त झालेल्या अनुभूतीतून वाचकाला त्या वातावरणाचे, तेथील जीवनाचे दर्शन घडते. मग समाजातील ब-या वाईट गोष्टींचे सूचन त्याला होते. समाजात अनेक समस्या आहेत. अनेक अनिष्ट प्रथाही आहेत. अशाच अनिष्ट प्रथेतून निर्माण झालेला भाविणींचा प्रश्न सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. या प्रश्नाशी संबंधित असणा-या या कादंब-यांचा अभ्यासही नेमकी समस्या समजण्याच्या दृष्टीने महत्वाचा

आहे. समाजातील सर्वच लोकांना योग्यतो जीवनस्तर लाभावा म्हणून होत असणा-या प्रयत्नात भावीण जीवनातील स्त्री-पुरूष कोणत्या सामाजिक स्तरात जगतात, त्यांचे जीवन, त्यांची एकूण परिस्थिती कशी आहे हे सर्वांनाच समजण्याची गरज आहे. म्हणूनच व्यापक सामाजिक उपयुक्ततेच्या भूमिकेतून भाविणींचे जीवन कसे असते हे पहावे म्हणून या अभ्यास विषयाचा विचार केला आहे. प्रत्यक्षात देवदासी असणा-या भाविणी या अंधश्रध्देला कवटाळून बसल्या आहेत आणि समाजाने त्यांच्याकडे पाहण्याचा दुर्लक्षित दृष्टिकोण कायम ठेवला आहे. दुर्दैवाने त्या स्त्रियांना समाजात आजही मानाने जगता येत नाही. आपल्याला मानाने जगता आले पाहिजे अशी मानवतेच्या पातळीवरची साधी अपेक्षाही त्यांनी आपल्या मनाशी बाळगू नये काय ? पारंपारिक उपेक्षेच्या गर्तेतून त्यांनी बाहेर येऊ नये काय ? समाज त्यांना परिवर्तनाच्या आणि प्रगतीच्या वाटेने चालायला लावणार नाही काय ? अशा सारखे प्रश्न या कादंब-या वाचल्यानंतर वाचकाच्या मनात निर्माण होतात. हे प्रश्न निर्माण होणे हेच या साहित्याच्या यशस्वितेचे व्यवच्छेदक लक्षण म्हणावे लागेल. कारण साहित्याचा व समाजाचा उपरोक्त अन्योन्य संबंध लक्षात घेता साहित्यात त्याची रंजकता राखून घडविलेले समस्येचे वास्तव दर्शन व परिवर्तनाचे दिग्दर्शन हे उचित व अपेक्षितच होय. म्हणून अंती सारांशाने असे म्हणता येते, की भाविणींच्या समस्येच्या पार्श्वभूमीवरील अभ्यासासाठी घेतलेल्या ' भावीण ' व ' महानंदा ' या कादंब-या सामाजिक व साहित्यिक कसोट्यांना यशस्वीपणे उतरताना दिसतात.

× संदर्भ ×

1) जोशी, लक्ष्मणशास्त्री — ' मराठी विश्वकोश - खंड 7 ', संपादक, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई - 1977, पृ. 911.